## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. ६

सभावृत्तांत

दिनांक ०५/०१/२०१८ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे जानेवारी २०१८ ची तहकुब मासिक सभा शुक्रवार दिनांक ०५/०१/२०१८ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रीय कार्यालयाच्या "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. कदम शशिकांत गणपत | सभापती |
| २) | मा. श्रीमती दर्शले रेखा राजेश | सदस्या |
| ३) | मा. श्रीमती ममता विनायक गायकवाड | सदस्य |
| ४) | मा. श्रीमती चोंधे आरती सुरेश | सदस्या |
| ५) | मा. श्री. कस्पटे संदीप अरुण | सदस्य |
| ६) | मा. श्रीमती कुटे निर्मला संजय | सदस्या |
| ७) | मा. श्रीमती शितल विठ्ठल उर्फ नाना काटे | सदस्या |
| ८) | मा. श्री. विठ्ठल उर्फ नाना काटे | सदस्य |
| ९) | मा.श्री. सागर सुनिल आंगोळकर | सदस्य |
| १०) | मा. श्रीमती मुंढे उषा अंकुश | सदस्य |
| ११) | मा. श्रीमती लोखंडे चंदा राजू | सदस्या |

-----------------

या शिवाय, मा.सिताराम बहुरे, क्षेत्रीय अधिकारी, तथा प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा. संदेश चव्हाण, कार्यकारी अभियंता विद्युत, , मा. संदेश खडतरे, उपअभियंता, बीआरटीएस, मा. माधव सोनवणे, उपअभियंता, विद्युत, मा. सुर्यकांत मोहिते, उपअभियंता, जलनि:सारण, मा. राजेंद्र इंगळे, उपअभियंता, झोनिपू, मा.विनोद बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. लेखाधिकारी श्री. अशोक बोनगीर, मा. एच.आर. सरवदे, कार्यालय अधिक्षक, अतिक्रमण, मा. गायकवाड एस.एस., मा. अजय जाधव, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. पाटील एस. वाय.,मा.संध्या वाघ, उपअभियंता, स्थापत्य, मा. भाऊसाहेब साबळे, मा. राजेंद्र जावळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. कुतवळ एस.यु, मा. अमिन दिक्षीत, मा. शरद मोरमारे, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. रोकडे जयवंत, मा. ढोले बी.आर., कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. भालेराव यु.ए., मा. महेश कावळे, कनिष्ठ अभियंता विद्युत, मा. विजय सोनवणे,

मा. खोत एस.एच. कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा. गेंगजे विश्वास, क्रीडा निरीक्षक, मा. संदीप कोतवडेकर, मा. फल्ले वाय.बी., मा. शशिकांत मोरे, मा. सोनवणे ए.सी., मा. सौदाई आर.एम., आरोग्य निरीक्षक,मा. अमर मद्रासी, मलेरिया इन्सपेक्टर, मा.दुदुसकर एस.एस.,मा. जी.एन. खैरे, उद्यान सहाय्यक, मा. एम.पी. सुभेदार, मा. काळे एल.टी. अतिक्रमण निरीक्षक, मा. पारसी एन.एस. आरोग्य निरीक्षक, पशु वैद्यकीय विभाग, इ. अधिकारी उपस्थित होते.

-----------

**मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव** : माहे जानेवारी २०१८ च्या नियमित ड प्रभाग समिती सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा.सभापती** : आजच्या सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.

**मा. सचिव, सभा शाखा** :- सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेकामी मान्यता मिळावी.

**मा. सभापती** :– सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता आहे.

**सन्मा. सदस्यांच्या मागणीप्रमाणे व मा. सभापती यांचे मान्यतेने सभेमध्ये खालील प्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्र.१**: प्रभाग क्र. २६ वाकड-पिंपळे निलख, मौजे वाकड सर्व्हे नं. १८९/१/२, माऊली चौक, वाकड रोड, नंदनवन कॉलनी शेजारील गल्लीस “राधा कृष्ण” कॉलनी हे नाव स्थानिक रहिवाशी यांच्या मागणीनुसार देणेबाबतचा प्रस्ताव

**विषय क्र**. २ : पिंपळे सौदागर येथील रोझलँड रेसिडेन्सी शेजारील स.नं. १३०, १३२,१३३,१३४ पैकी महापालिकेचे उद्यान आरक्षण क्र. ३७१ ब प्रमाणे उद्यान विकसित करण्यात येत आहे. या उद्यानाला शोभेल असे “राजमाता जिजाऊ उद्यान” नामकरण करणेचा प्रस्ताव

**तदनंतर मा. ड प्रभाग समिती माहे जानेवारी २०१८ चे नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.**

**मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव : माहे जानेवारी २०१८ च्या नियमित सभेचे कार्यपत्रिका क्र. ६ वरील विषयास मंजुरी मिळावी.**

**मा. सभापती** :- माहे जानेवारी २०१८ चे नियमित सभेचे कार्यपत्रिका क्र. ६ वरील विषयांवर खालीलप्रमाणे मंजुरी देणेत येत आहे.

विषय क्र. १ ठराव क्र. ९

दिनांक : ०५/०१/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक: मा.श्रीमती आरती सुरेश चोंधे अनुमोदक :मा. तुषार गजानन कामठे

संदर्भ:मा.श्रीमती आरती सुरेश चोंधे यांचेकडील दि.०८/१२/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ विशालनगर, पिंपळे निलख येथील पंचशीलनगर भागातील पिंपळे निलख – बाणेर रस्त्यावरील महादेव मंदीर रस्ता, स.नं. ६७, गौतम कांबळे यांच्या घराशेजारील रस्त्यास “जगताप चौक” असे नाव देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत असुन सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

--------------

विषय क्र. २ ठराव क्र. १०

दिनांक : ०५/०१/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक: मा.श्रीमती चंदा राजू लोखंडे अनुमोदक :मा. श्रीमती उषा अंकुश मुंढे

संदर्भ:मा.श्रीमती चंदा राजू लोखंडे यांचेकडील दि.०६/१२/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २९ येथील वैदूवस्तीमध्ये दोन्ही बाजूस असलेला सार्वजनिक शौचालय बंद करावे कारण महाराष्ट्र शासनाच्या वतीने हगणदारी मुक्त योजनेंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य खात्यामार्फत वैयक्तिक शौचालय बांधून दिलेले आहे व काहींना अनुदान दिलेले आहे. तरी वैदूवस्तीमध्ये दोन्ही बाजूस असलेले सार्वजनिक शौचालय बंद करणेबाबतचा प्रस्ताव सहा. आरोग्याधिकारी यांचेकडून अहवाल प्राप्त होईपर्यंत तहकुब ठेवणेत येत आहे.

-----------------

**मा. सचिव, सभाशाखा** : सन्मा. नगरसदस्यांच्या मागणीनुसार व मा. सभापती यांचे मान्यतेने दिनांक ०५/०१/२०१८ रोजीच्या सभेमध्ये ऐनवेळी दाखल केलेले विषयांवर खालीलप्रमाणे मंजुरी देणेत आली.

विषय क्र.३ ठराव क्र. ११

दिनांक : ०५/०१/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक: मा.श्री. संदिप अरुण कस्पटे अनुमोदक: मा.श्रीमती ममता विनायक गायकवाड

संदर्भ:मा. श्री. संदिप अरुण कस्पटे यांचेकडील दि.०५/०१/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ वाकड-पिंपळे निलख, मौजे वाकड सर्व्हे नं. १८९/१/२, माऊली चौक, वाकड रोड, नंदनवन कॉलनी शेजारील गल्लीस “राधा कृष्ण” कॉलनी हे नाव स्थानिक रहिवाशी यांच्या मागणीनुसार देणेबाबतचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-------------

विषय क्र. ४ ठराव क्र. १२

दिनांक : ०५/०१/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक: मा.श्री.विठ्ठल उर्फ नाना कृष्णाजी काटे अनुमोदक:मा.सौ. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

संदर्भ : मा.श्री.विठ्ठल उर्फ नाना कृष्णाजी काटे यांचा दिनांक ०५/०१/२०१८ रोजीचा प्रस्ताव

पिंपळे सौदागर येथील रोझलँड रेसिडेन्सी शेजारील स.नं. १३०, १३२,१३३,१३४ पैकी महापालिकेचे उद्यान आरक्षण क्र. ३७१ ब प्रमाणे उद्यान विकसित करण्यात येत आहे. या उद्यानाला शोभेल असे “राजमाता जिजाऊ उद्यान” नामकरण करणेचा प्रस्तावावर चर्चा झाली. त्यात मा. श्रीमती निर्मला कुटे यांनी नामकरणाची कार्यवाही करताना किती जागा ताब्यात असणे आवश्यक आहे याबाबत माहिती मिळावी असे मत व्यक्त केले. मा. सभापती यांनी नामकरणाचे प्रकरणी सर्व कायदेशीर बाबींचा विचार करुन सदर बाबत अंमलबजावणी करणेबाबत मत व्यक्त केले. सबब जो पर्यंत संपूर्ण जागा ताब्यात येत नाही तोपर्यंत सदरचा विषय तहकुब ठेवणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

--------------

मा. सभापती : सन्मा. सदस्य व अधिकारी वर्ग माहे जानेवारी २०१८ चे मासिक सभेचे कामकाज खेळीमेळीचे वातावरणात पूर्ण झाले असुन अशाच पध्दतीने पूर्ण वर्षभर कामकाज होईल अशी अपेक्षा व्यक्त करुन तसेच सर्व उपस्थितांचे आभार मानुन माहे जानेवारी २०१८ ची प्रभाग समिती सभा संपल्याचे जाहीर करतो.

सही/-

(कदम शशिकांत गणपत)

**सभापती**

ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,

रहाटणी ४११०१७

सही/-

क्रमांक – ड/१३/कावि/ ६७ /२०१८ **प्रशासन अधिकारी तथा सचिव**,

दिनांक – २४ /०१/२०१८ (सभाशाखा),

ड प्रभाग समिती